**शासनाने नगर परिषदांमध्ये एक सदस्यीय ऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दत लागू केल्याने नगर परिषद/नगर पंचायत प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारित आदेश.**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नपा-२०१६/प्र.क्र. १० /का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - १५ जून, २०१६

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेड ए मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांबाबतची जबाबदारी राज्य शासनाने पारीत केलेल्या अधिनियम/ नियमानुसार घेण्याची राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आणि ज्याअर्थी,राज्यामध्ये डिसेंबर,२०१६ ते फेब्रुवारी,२०१७ या कालावधीत मुदती संपणा-या सुमारे १९५ नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका तत्पूर्वी घेणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेची कार्यवाही सुमारे दिनांक ०१ जून,२०१६ पासुन सुरु करण्यात येईल असे राज्य निवडणूक आयोगाने अ.शा.पत्र क्रमांक रानिआ /नप-२०१६/प्र.क्र.१९/का-०६, दिनांक १९/०१/२०१६ अन्वये शासनास कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक - १९ मे,२०१६ रोजी "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा,नगरपंचायती व औदयोगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०१६, ( सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक ९ )" अन्वये नगरपरिषदांमध्ये एक सदस्यीय ऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे व दिनांक - १३ जून,२०१६ रोजी, "महाराष्ट्र नगरपरिषदा ( प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत ) नियम, २०१६" पारित केले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेबाबतचे यापूर्वीचे खालील आदेश अधिक्रमित करुन यात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

(i) क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.०५, दि.०३/०५/२००५

(ii) क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.५/का.५, दि.१०/०७/२००९

(iii) क्रमांक रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२६/का-५,दि.०६/०२/२०१५

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना करण्याबाबतचे यापूर्वीचे सर्व आदेश रद्द करुन आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का.६, दि.०७-०५-२०१६ अन्वये प्रभाग रचनेचे सर्व अधिकार संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० व १० अ (४) यानुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी, ज.स.सहारिया, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांकरिता प्रभाग रचना, आरक्षण ठरविण्याकरिंता खालीलप्रमाणे नव्याने आदेश पारीत करीत आहे.

१. प्रभागांची संख्या ठरविणे

अ) नगर परिषदेची प्रभाग संख्या ठरविणे :-

(i) नगर परिषदेच्या प्रत्येक प्रभागामध्ये कमीत कमी दोन किंवा जास्तीत जास्त तीन सदस्य देय होणार आहेत. या करिता नगर परिषदेच्या सदस्य संख्येच्या आधारे अधिनियमातील तरतुदीनुसार प्रभागांची संख्या निश्चित करावयाची आहे.

(ii) ज्या नगर परिषदांची सदस्य संख्या ही सम संख्या असेल त्या नगर परिषदेकरिता एकूण सदस्य संख्या भागीले २ या सुत्रानुसार जी संख्या येईल तेवढे प्रभाग संबंधित नगर परिषदेमध्ये असतील. हे सर्व प्रभाग दोन सदस्यीय असतील.

(iii) ज्या नगर परिषदांची सदस्य संख्या ही विषम संख्या असेल त्या नगर परिषदेकरिता एकूण सदस्य संख्येमधून ३ वजा करून जी संख्या येईल त्या

संख्येला २ ने भागावे. येणारी संख्या ही दोन सदस्य असलेल्या प्रभागांची संख्या असेल आणि एक प्रभाग ३ सदस्यांचा असेल. असा प्रभाग कोणत्या क्षेत्रात राहील हे भौगोलिक सलगता राखण्याच्यादृष्टीने प्रभाग रचना करताना मतदारांची गैरसोय टाळता येईल, अशा ठिकाणी ठेवण्यात यावा. याकरिता खालील परिच्छेद क्र.६ मध्ये नमूद निकष विचारात घ्यावेत. मात्र, अशी कोणतीही परिस्थिती नसल्यास शेवटचा प्रभाग तीन सदस्यांचा राहील. नगरपरिषद क्षेत्राचे प्रभाग पाडल्यानंतर प्रत्येक प्रभागात निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येनुसार प्रभागातील जागांना प्रभागाच्या अनुक्रमांकासह अ, ब व यथास्थिती क असे क्रमांक देण्यात यावेत. उदा. प्रभाग क्रमांक ५ मध्ये ३ जागा असल्यास त्यांचे क्रमांक ५-अ, ५-ब व ५-क असे द्यावेत.

ब) नगर पंचायतीमध्ये प्रभाग संख्या ठरविणे :-

(i) नगर पंचायतीमध्ये प्रत्येक प्रभागाकरिता अधिनियमातील तरतुदींनुसार एकच सदस्य निवडणूक दयावयाचा असल्याने सदस्य संख्येइतकेच म्हणजेच १७ प्रभाग होतील.

(ii) नगर पंचायतीमध्ये नगर पंचायतीची एकूण लोकसंख्या भागीले एकूण सदस्य संख्या (१७) या सुत्राने येणारी लोकसंख्या ही प्रभागाची सरासरी लोकसंख्या असेल.

२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय असल्यास :-

(अ) नव्याने स्थापन होणाऱ्या नगर परिषदा/नगर पंचायतीमध्ये अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास ती जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित होईल किंवा कसे, हेसुध्दा सोडतीने ठरविण्यात यावे. मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/जमातीच्या महिलांसाठी आरक्षित असेल तर ती जागा आता महिलांसाठी आरक्षित होणार नाही.

(ब) अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी मागील व आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास, मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/ जमातीच्या

महिलेसाठी आरक्षित असेल तर ती जागा आगामी होणाऱ्या नगर परिषद/नगर पंचायत निवडणुकीसाठी संबधित प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित होणार नाही. तसेच मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/जमातीच्या महिलेसाठी आरक्षित नसेल तर ती जागा आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी संबधित प्रवर्गातील महिलेसाठी थेट आरक्षित होईल.

३. **प्रत्यक्ष प्रभाग रचना करण्यासाठीच्या सूचना :-**

(१) मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत यांनी राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली प्रारुप प्रभाग रचनेचे काम योग्यप्रकारे करावे.

(२) भारतीय संविधानातील प्रकरण क्रमांक-९अ (नगरपालिका) यामध्ये दिलेल्या लोकसंख्येच्या व्याख्येनुसार, लोकसंख्या म्हणजे "ज्या जनगणनेची संबंधित आकडेवारी प्रसिध्द करण्यात आली आहे, अशा लगतपूर्वी झालेल्या (सन २०११ च्या) जनगणनेवरुन निर्धारित लोकसंख्या." प्रभाग रचना करताना शेवटच्या प्रसिध्द झालेल्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या व अनुसूचित जमातीची लोकसंख्या यांची आकडेवारी विचारात घ्यावी.

(३) प्रभाग रचना करताना जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेतलेला लोकसंख्येचा तपशील (जनगणना प्रभागनिहाय व प्रगणक गटनिहाय) विचारात घ्यावा.

(४) नगर परिषदेकरिता बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये नवीन प्रभाग करताना नगरपरिषदेची एकूण लोकसंख्या भागिले निवडून दयावयाच्या एकूण सदस्यांची संख्या या सूत्रानुसार येणाऱ्या लोकसंख्येस त्या प्रभागातील सदस्यांच्या संख्येने (यथास्थिती २ किंवा ३) गुणून येणारी लोकसंख्या ही प्रभाग रचना करण्यासाठी प्रभागाची सरासरी लोकसंख्या असेल. तथापि, नगर पंचायतीमध्ये एक सदस्यिय प्रभाग असल्याने नगर पंचायतीची एकूण लोकसंख्या भागिले एकूण सदस्य संख्या ही प्रत्येक प्रभागाची सरासरी लोकसंख्या असेल. मात्र सर्वच प्रभाग सरासरी लोकसंख्येइतके करणे शक्य नसल्यास या लोकसंख्येमध्ये १० टक्के अधिक व १०

टक्के कमी लोकसंख्येचे प्रभाग तयार करता येतील. तथापि, याबाबतची कारणे प्रास्तावात नमूद करावीत.

(५) प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य ( उत्तर-पूर्व ) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील याची काळजी घ्यावी.

(६) प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्यातरी नागरिकांच्या सामाईक हिताकरिता खालील बाबी **शक्यतोवर** विचारात घ्याव्यात.

(i) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ii) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(iii) शक्यतोवर प्रभागातील नागरिकांकरिता स्थानिक बाजारहाटाची जागा सामाईक असावी.

(iv) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतोवर विचारात घ्यावे.

(v) नागरिकांकरिता देण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयाच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा शक्यतोवर सामाईक असाव्यात.

(vi) नागरिकांकरिता उपलब्ध असणारी प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने इत्यादी शक्यतोवर सामाईक असावीत.

(vii) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक शाळा इत्यादी शक्यतोवर सामायिक असाव्यात.

(७) प्रभागाच्या सीमारेषा, रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, मोठे रस्ते, फ्लाय ओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच

पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका उत्पन्न होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

(८) प्रभाग रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीत प्रगणक गट फोडावा लागल्यास त्या प्रगणक गटाची घरयादी उपलब्ध आहे याची खात्री करावी. प्रगणक गट फोडल्यास घर यादीप्रमाणे लोकसंख्या विभागावी व भौगोलिक सीमा योग्यप्रकारे दाखविली जाईल याची काळजी घ्यावी.

(९) अपवादात्मक परीस्थितीमध्ये प्रगणक गटाची लोकसंख्या जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध होत नाही. तसेच काही नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रामध्ये प्रगणक गटाची संख्या करावयाच्या प्रभागांपेक्षा कमी असल्याने प्रगणक गट फोडणे आवश्यक असते. तसेच बऱ्याचशा नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रामध्ये असलेल्या लोकसंख्येचे वितरण असमान असते. त्यामुळे प्रभागाची लोकसंख्या शक्यतोवर समान असावी याकरिता प्रगणक गट फोडण्याची आवश्यकता भासते. यासर्वबाबी विचारात घेता आवश्यकता भासल्यास नगर परिषद/नगरपंचायतीच्या क्षेत्राची प्रभाग रचना करण्याकरिता संबधित क्षेत्राचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून २०११ च्या जनगणनेच्यावेळी असलेली लोकसंख्या संबंधित क्षेत्रात कशा प्रकारे वितरित झाली आहे हे निश्चित करणे आवश्यक आहे. त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(i) ज्या नगर परिषद/नगर पंचायतींच्या बाबतीत अशी माहिती प्राप्त नाही त्यांचे बाबतीत माहिती उपलब्ध होवू शकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संचालक, जनगणना कार्यालय यांचेकडून घेण्यात यावे.

(ii) ज्या ठिकाणी प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गटाची एकूण लोकसंख्या, अनुसुचित जातीची व अनुसुचित जमातीची लोकसंख्या उपलब्ध नाही किंवा प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे. त्याप्रकरणी सोबतच्या परिशिष्ट क्र-८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली आहे. हे निश्चित करावे. सर्वेक्षण

करतांना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करतांना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्यावर राहत होती किंवा कसे संबंधित इमारत कधी बांधण्यात आली,२०११ च्या जनगणनेनंतर झालेले जन्म/मृत्यु इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

(१०) प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करुन सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील कुठल्याही नागरिकास प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

(११) नगरपरिषद/नगर पंचायत निवडणुकांकरीता परिशिष्ट क्रमांक १ ते ८ प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावासोबत (मराठी व इंग्रजी) मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावीत.

(१२) नकाशामध्ये जनगणनेचे वॉर्ड आणि प्रगणक गट स्पष्ट दाखवावेत व त्यांचे क्रमांकही स्पष्ट दर्शवावेत.

(१३) प्रारुप प्रभाग रचनेस जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी संबंधित नगरपरिषद /नगर पंचायतींच्या क्षेत्रांमध्ये सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग (त्यामध्ये स्त्रियांच्या आरक्षणासह) राखीव ठेवावयाच्या जागा व उर्वरित स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा यांचे आरक्षण निश्चित करावे. सोडत जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकारी यांचेपेक्षा कमी दर्जाचा नाही अशा अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. सभेचे स्थळ-वेळ व दिनांक निश्चित करुन त्या सभेची माहिती नागरिकांना संबंधित नगरपरिषद/नगर पंचायत क्षेत्रात मोठया प्रमाणात खप असलेल्या दैनिक वर्तमानपत्रात नोटीशीद्वारे, जिल्हाधिकारी यांनी दयावयाची आहे. तसेच प्रसिध्दी वेबसाईटवरही द्यावयाची आहे.

(१४) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा सोडतीसाठी येणा-या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सोडतीच्या आधी त्या प्रभागाचा क्रमांक व त्याच्या चतु:सीमा जाहीर कराव्यात.

(१५) नगर परिषद/नगर पंचायतींच्या बाबतीत प्रारुप प्रभाग रचनेस जिल्हाधिका-यांची मान्यता मिळाल्यानंतर मंजूरीच्या पत्रातील सूचनांप्रमाणे आवश्यक तेथे फेरफार करुन त्यानंतर सोडतीमध्ये निश्चित झालेली आरक्षणे नमूद करुन संबंधित कायदयातील तरतुदी विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रारुप प्रभाग रचनेस प्रसिध्दी द्यावी. यासंबंधी संबंधित क्षेत्रात जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दयावी.

(१६) नगर परिषद/नगर पंचायतींच्या बाबतीत आलेले आक्षेप व सूचना यांना अनुसरुन संबंधितांना सुनावणी जिल्हाधिकारी स्वत: देतील. जिल्हाधिकारी यांनी हे अधिकार पुन्हा: प्रदान करु नयेत.

(१७) सुनावणी झाल्यानंतर व त्यात मांडण्यात आलेला आक्षेप व सूचना याबाबत विचार करुन संबंधित विभागीय आयुक्त प्रभाग रचनेस अंतिम मान्यता देतील. अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना संबंधित जिल्हाधिकारी शासन राजपत्रात प्रसिध्द करतील.

(१८) या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

१५/६/१६

(ज.स.सहारिया)
आयुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

२. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
८. निवड नस्ती/कार्या.६

# परिशिष्ट-१

**नगर परिषद/नगर पंचायतीची लोकसंख्या,सदस्य संख्या,प्रभाग संख्या, प्रभागाची सरासरी,कमाल,किमान लोकसंख्या आणि आरक्षित जागांची संख्या.**

नगर परिषद / नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक - ------

| अ.क्र. | तपशील | संख्या | | |
|---|---|---|---|---|
| १. | नगर परिषद/ नगर पंचायतीचे नाव | | | |
| २ | नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्राची लोकसंख्या | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या | अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या |
| | | | | |
| ३ | निवडून दयावयाच्या नगर परिषद/ नगर पंचायत सदस्यांची संख्या | | | |
| ४ | नगरपरिषद/ नगर पंचायत प्रभागांची संख्या (नगर पंचायत निवडणूकांबाबत केवळ एकूण प्रभागांची संख्या नमूद करावी) | २ सदस्यीय प्रभागांची संख्या | ३ सदस्यीय प्रभागांची संख्या | एकूण |
| | | | | |
| ५ | अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या | | | |
| ६ | अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या | | | |
| ७ | प्रभागाची लोकसंख्या | सरासरी | कमाल (सरासरीच्या १०%अधिक) | किमान (सरासरीच्या १०%कमी) |
| | अ) २ सदस्यीय प्रभागांकरीता ( नगर परिषद) | | | |
| | ब) ३ सदस्यीय प्रभागांकरीता ( नगर परिषद) | | | |
| | नगर पंचायत- १ सदस्यीय प्रभाग | | | |
| ८ | अनुसूचित जातीकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) | | | |
| ९ | अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) | | | |
| १० | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा (स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) | | | |
| ११ | स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा | एकूण स्त्रिया | | |
| | | अनुसूचित जातीच्या स्त्रिया | | |
| | | अनुसूचित जमातीच्या स्त्रिया | | |
| | | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रिया | | |
| | | स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा | | |
| १२ | एकूण अनारक्षित जागा | | | |

सही

जिल्हा ... ... ... ...

मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत

टीप:- स्त्रियांकरीता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकीत करण्यात यावा.

## परिशिष्ट-२

### (परिशिष्ट - १ चा सारांश)

**नगर परिषद/नगर पंचायतीची लोकसंख्या,सदस्य संख्या,प्रभाग संख्या, प्रभागाची सरासरी,कमाल,किमान लोकसंख्या आणि आरक्षित जागांची संख्या.**

**----------------------नगरपरिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक सन २०१६-१७**

| एकूण लोकसंख्या (१) | अनुसूचित जातीची लोकसंख्या (२) | अनुसूचित जमातीची लोकसंख्या (३) | प्रभागाची लोकसंख्या (४) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ सदस्यानुसार (नगर पंचायतकरिता) (४-अ) | | २ सदस्यांनुसार (४-ब) | ३ सदस्यांनुसार (४-क) |
| | | | सरासरी | | | |
| | | | किमान | | | |
| | | | कमाल | | | |

**एकूण सदस्य संख्या व आरक्षण**

| एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | ना.मा.प्र | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| **पैकी स्त्रियांसाठी आरक्षित पदे** | | | | |
| | | | | |

परिशिष्ट-३

प्रभाग निहाय लोकसंख्या,प्रभागाची व्याप्ती व आरक्षण

नगरपरिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक----

| प्रभाग क्रमांक (Ward No) | प्रभागाचे नाव असल्यास (Name of the Ward No,if any) | प्रभागाची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | जागा क्रमांक (Seat No) | प्रभागाची व्याप्ती (Discription of boundry of the Ward) (उत्तर,पूर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/ अनु.जमाती/नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/ अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन) (Reservation Category,SC,ST,BCC,Women in SC,ST,BCC Category) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| | | | | | |
| | | | | | |

सही

जिल्हा-……… …          मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगर पंचायत

टीप :- हा नमुना इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये असावा.

# परिशिष्ट ४

## प्रभागनिहाय माहिती

## (ELECTION WARD WISE INFORMATION)

## ......नगर परिषद/ नगर पालिका (MUNICIPAL COUNCIL)

| निवडणूक प्रभाग क्रमांक (Election Ward No.) | जनगणना प्रगणक (Census Enumaration) | | एकूण लोकसंख्या (Total Population) | अ.जा. लोकसंख्या (SC Population) | अ.ज. लोकसंख्या (ST Population) |
|---|---|---|---|---|---|
| | वार्ड क्र. (Ward No) | ब्लॉक क्र. (Block No.) | | | |
| १ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |
| २ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# परिशिष्ट ५

## जनगणना प्रगणक गट निहाय माहिती

## (ENUMERATION BLOCK WISE INFORMATION)

### ......नगर परिषद/ नगर पालिका (MUNICIPAL COUNCIL)

| अ.क्र. (Sr No.) | जनगणना प्रभाग (Enumeration Ward No) | जनगणना प्रगणक गट क्र. (Enumeration Block No.) | एकूण लोकसंख्या (Total Population) | अ.जा. लोकसंख्या (SC Population) | अ.ज. लोकसंख्या (ST Population) | लोकसंख्या प्रभाग क्र.(ज्यामध्ये प्रगणक गट समाविष्ट झाला आहे.) Ward No. In Which the EB is included |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

# परिशिष्ट ५ चे उदाहरण

## नमुना विवरणपत्र

### ......नगर परिषद/ नगर पालिका (MUNICIPAL COUNCIL)

| अ.क्र. (Sr No.) | जनगणना प्रभाग (Enumeration Ward No) | जनगणना प्रगणक गट क्र. (Enumeration Block No.) | एकूण लोकसंख्या (Total Population.) | अ.जा. लोकसंख्या (SC Population) | अ.ज. लोकसंख्या (ST Population) | लोकसंख्या प्रभाग क्र.(ज्यामध्ये प्रगणक गट समाविष्ट झाला आहे.) Ward No. In Which the EB is included |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | ... | ... | ... | १ |
| २ | १ | २ | ... | ... | ... | ५ |
| ३ | १ | ३ | ... | ... | ... | ५ |
| ४ | १ | ४ | ... | ... | ... | १ |
| ५ | २ | १ | ... | ... | ... | ६ |
| ६ | २ | २ | ... | ... | ... | ६ |
| ७ | २ | ३ | ... | ... | ... | २ |
| ८ | २ | ४ | ... | ... | ... | २ |
| | | | | | | |
| | याप्रमाणे | याप्रमाणे | | | | |

## परिशिष्ट ६

### ......नगर परिषद/ नगर पंचायत (MUNICIPAL COUNCIL)

### अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी उतरत्या क्रमाने दर्शविणारा तक्ता

STATEMENT SHOWING PERSENTAGE OF SCHEDULE CASTE POPULATION IN DESCENDING ORDER

| अ.क्र. (Sr No.) | प्रभाग क्र. (WARD NO.) | एकूण लोकसंख्या ( Total Population.) | अ.जा. लोकसंख्या (SC Population) | अ.ज. लोकसंख्या (ST Population) | अ.जा. लोकसंख्या% (SC Population %) | अ.जा.आरक्षण (S.C.Reservation.) (जागा क्र) (Seat No) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| परिशिष्ट ७ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ......नगर परिषद/ नगर पंचायत (MUNICIPAL COUNCIL) | | | | | | |
| अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी उतरत्या क्रमाने दर्शविणारा तक्ता<br>STATEMENT SHOWING PERSENTAGE OF SCHEDULE TRIBE POPULATION IN DESCENDING ORDER | | | | | | |
| अ.क्र.<br>(Sr No.) | प्रभाग क्र.<br>(Ward No.) | एकूण लोकसंख्या<br>(Total population.) | अ.जा.<br>लोकसंख्या<br>(SC Population) | अ.ज.<br>लोकसंख्या<br>(ST Population) | अ.ज.<br>लोकसंख्या%<br>(ST Population %) | अ.ज.आरक्षण<br>(S.T.Reservation.)<br>(जागा क्र)<br>(Seat No) |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## परिशिष्ट-८

**(लोकसंख्येचा तपशिल प्राप्त झाला नाही किंवा प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे, अशा प्रकरणी सर्वेक्षणाने निश्चित केलेल्या लोकसंख्येचा तपशिल)**

_______ नगर परिषद/नगर पंचायत यांचे बाबतीत प्रभाग रचना करण्याकरिता २०११ च्या जनगणनेचे प्रगणक गटाचे नकाशे किंवा त्यासंबंधीची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या इत्यादी माहिती प्राप्त झाली नाही किंवा प्रभागाची रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे अशा प्रकरणी निवडणुकीकरिता २०११ च्या जनगणनेच्यावेळी असलेली लोकसंख्या संबंधित क्षेत्रात कशाप्रकारे वितरित झाली आहे हे निश्चित केली आहे त्याचा तपशील.-

सर्वेक्षण केल्याची तारीख :-..............

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | सन २०११ ची लोकसंख्या | अनुसुचित जाती (असल्यास लोकसंख्या) | अनुसुचित जमाती (असल्यास लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

सर्वेक्षणानुसार एकूण लोकसंख्या....................
अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या..............
अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या............

मुख्याधिकारी,
नगर परिषद/नगर पंचायत

जिल्हाधिकारी